**<u>ठळक बातम्या</u>**

- आंध्र प्रदेशात २ लाख कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ

- रस्ते अपघातातल्या जखमींसाठी दीड लाखापर्यंत विनारोकड उपचार योजना सुरु, हिट अँड रनमधल्या मृतांच्या वारसांना २ लाख रुपयांची मदत

- मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे त्याअनुषंगानं मिळणारे लाभ देण्याची राज्याची केंद्र सरकारकडे मागणी

**आणि**

- सुमारे १० लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन नक्षलवादी महिलांचं गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात, सुमारे  २ लाख कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विशाखापट्टणम इथून करण्यात आलं. आंध्र विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित सभेला प्रधानमंत्र्यांनी संबोधित केलं. ‘आजचा दिवस हा आंध्र प्रदेशासाठी महत्वाचा आहे कारण हरित ऊर्जेसाठी पुढाकार आणि पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्यासाठीचे प्रकल्प उभे राहत आहेत’, असं प्रधानमंत्री म्हणाले.

आंध्र प्रदेशच्या विकासाकरिता केंद्र सरकार वचनबद्ध आहे असंही त्यांनी सांगितलं. पूडिमढाका इथं ग्रीन हायड्रोजन हब प्रकल्प उभारला जात असून यासाठी १ लाख ८५ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाची देखील पायाभरणी केली याशिवाय प्रधानमंत्र्यांनी ४ हजार ५९३ कोटी रुपयांच्या रस्ते बांधकाम आणि रस्तेवृद्धी प्रकल्पाची आणि ६ हजार २८ कोटी रुपयांच्या सहा रेल्वे प्रकल्पांची देखील पायाभरणी केली. तिरुपती जिल्ह्यात इंडस्ट्रीयल पार्क सिटी, विशाखापट्टणम इथे दक्षिण किनारपट्टी रेल्वे झोन मुख्यालय तसंच बल्क ड्रग पार्क याचीही कोनशिला प्रधानमंत्रांच्या हस्ते ठेवण्यात आली. सात रेल्वे प्रकल्प आणि ३ रेल्वे मार्ग यावेळी प्रधानमंत्र्यांनी राष्ट्राला समर्पित केले. दरम्यान, विशाखापट्टणम इथे आगमन झाल्यावर प्रधानमंत्री मोदी यांनी आंध्र प्रदेशचे मुखमंत्री एन चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री के. पवन कल्याण यांच्यासमवेत रोड शो केला.

**<><><><><>**

रस्ते अपघातातल्या जखमींसाठी विनारोकड उपचार देणारी योजना केंद्र सरकारनं आजपासून सुरू केली. याअंतर्गत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचारांसाठी कोणतीही रोख रक्कम द्यावी लागणार नाही. याशिवाय हिट अँड रनमध्ये मृत्यू झालेल्यांच्या वारसांना २ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत दिली जाईल. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नवी दिल्लीत आज ही घोषणा केली.

गेल्यावर्षभरात देशभरात रस्ते अपघातात १ लाख ८० हजार व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यापैकी ३० हजार जण हेल्मेट न घातल्यानं मृत्यूमुखी पडले. मृतांमध्ये ६६ टक्के तरुण होते अशी माहिती गडकरी यांनी दिली.

**<><><><><>**

मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे इतर लाभ देण्याची विनंती राज्य सरकारनं आज केंद्राला केली. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांची भेट घेतली. त्यावेळी यासंदर्भात ४ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्राची प्रत शेखावत यांनी सामंत यांना सुपूर्द केली. मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बांग्ला या भाषांना अभिजात दर्जा दिल्याचा उल्लेख त्यात आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रस्ताव २-३ आठवड्यात सादर करु असं सामंत म्हणाले.

**होल्ड- बाईट - उदय सामंत**

महाराष्ट्रासह इतर राज्यात तसंच विदेशातही मराठी भाषेचं जतन संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुळे यांनी दिली.

**होल्ड - बाईट - मुळे**

**<><><><><>**

देशाचं आणि समाजाचं नुकसान करत असलेल्या, न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी, समाजानं एकत्र येणं आवश्यक आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र

फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नवी मुंबई पोलीस आयुक्तालयानं वाशी इथं आयोज्त केलेल्या “नशामुक्त नवी मुंबई” अभियानाचं उद्घाटन करताना बोलत होते.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि “नशामुक्त नवी मुंबई” या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, स्थानिक लोक प्रतिनिधी, उपस्थित होते. मुंबईत भायखळा इथल्या वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणी संग्रहालयात असलेल्या डॉ.भाऊ दाजी लाड संग्रहालयाचं नूतनीकरण मुंबई महानगरपालिकेनं केलं आहे. या नूतनीकरण केलेल्या संग्रहालयाचं लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><><>**

शासकीय रुग्णालयात रुग्णांसाठी अधिकाधिक दर्जेदार आणि अद्ययावत सेवा देण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण, अन्न आणि औषध प्रशासन तसंच सामान्य प्रशासन विभागाच्या पुढील १००दिवसांच्या आराखड्याचा आढावा घेताना ते मुंबईत बोलत होते. औषधं तसंच अन्नपदार्थांमधल्या भेसळीला प्रतिबंध करण्यासाठी काटेकोर उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

**<><><><><>**

भारत देश एक आधुनिक, सर्वसमावेशक आणि प्रगतीशील समाज निर्माण करण्यासाठी दीर्घकालीन आव्हानांचा सामना करत सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून यशस्वीपणे प्रवास करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केलं आहे. १८ व्या ‘प्रवासी भारतीय

दिवस’ अधिवेशनाला आज सकाळी ओडिशात भुवनेश्वर इथं सुरुवात झाली. त्यावेळी ते बोलत होते. ‘विकसित भारतासाठी प्रवासी भारतीयांचं योगदान’ ही यंदाच्या अधिवेशनाची संकल्पना आहे.

या अधिवेशनात ७५ देशांमधले सहा हजारापेक्षा जास्त अनिवासी भारतीय सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

सुमारे १० लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या दोन नक्षलवादी महिलांनी आज गडचिरोलीत पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. शामला उर्फ लीला झुरु पुडो, आणि काजल उर्फ तिम्मी मंगरु वड्डे अशी त्यांची नावं आहेत.

शामला पुडो ही एटापल्ली तालुक्यातल्या गट्टेपल्ली इथली रहिवासी असून २००२ मध्ये ती चामोर्शी दलममध्ये सहभागी झाली. सध्या ती कंपनी क्रमांक १० ची सेक्शन कमांडर होती. तिच्यावर २१ चकमकी, ६ जाळपोळ, आणि इतर १८, अशा एकूण ४५ गुन्ह्यांची नोंद आहे. शासनानं तिच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केले होतं.

काजल वड्डे २०१८ पासून भामरागड दलममध्ये कार्यरत होती. एकूण ८ गुन्ह्यांची नोंद आहे. शासनानं तिच्यावर दोन लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मालदीवचे संरक्षण मंत्री मोहम्मद घासन मौमून यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत नियमित लष्करी सराव, प्रशिक्षण आणि सुरक्षा प्रकल्प तसंच

संरक्षण सहकार्य याविषयी दोघांमध्ये चर्चा झाली. भारत-मालदीव सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य, सागरी सुरक्षा भागीदारीसाठी एकत्र काम करण्याबाबत वचनबद्धता दोन्ही देशांनी व्यक्त केली.

यावेळी संरक्षण सहकार्य वाढवण्याबाबत ही दोघांमध्ये चर्चा झाली, मालदीवचे संरक्षण मंत्री तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून ते गोवा आणि मुंबईलाही भेट देतील.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज महाकुंभ २०२५ ला समर्पित आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या विशेष गाण्याचं प्रकाशन केलं. यावर्षी १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान प्रयागराजमध्ये महाकुंभ आयोजित केला जाणार आहे.

<><><><><>

दीनदयाळ बंदराची मालवाहतूक क्षमता ३० कोटी मेट्रिक टनांपर्यंत पोहचली असून हरित हायड्रोजन क्षेत्रात महत्त्वाचं केंद्र बनेल असं केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज म्हटलं. त्यांनी गुजरातमधल्या कांडला इथं दीनदयाळ बंदर प्राधिकरण इथं अनेक प्रकल्पांच उद्घाटन केल. यावेळी त्यांनी हायड्रोजन एक्सलन्स केंद्राची पायाभरणी केली.

<><><><><>

‘वन नेशन - वन इलेक्शन’ अर्थात ‘एक राष्ट्र - एक निवडणूक’ या संबंधित दोन विधेयकांवर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीची आज

नवी दिल्ली इथं पहिली बैठक झाली. या दोन विधेयकांना एकशे एकोणतीसावं संविधान सुधारणा विधेयक २०२४, आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक २०२४, असं नाव दिलं आहे.

या समितीमध्ये लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ असे एकूण ३९ सदस्य आहेत. संसदेच्या पुढच्या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी ही समिती आपला अहवाल सादर करेल.

**//<><><><><>//**